# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०६/२०२४ (शुक्रवार) दुपार

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलीस स्टेशन खापा ची कार्यवाही

दिनांक २७/०६/२०२४ चे ०१.१० वा. ते ०१.४० वा. दरम्यान पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे खापा हद्दीतील मौजा गडेगाव ते खानगाव रोड येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा गडेगाव ते खानगाव रोड येथे खापा पोलिस स्टाफ यांनी नाकाबंदी करून लाल रंगाचे महिंद्रा ५७५ डि आय कंपनीचे ट्रॅक्टर क्र. एम एच २९/बी सी २५८६ व त्याला लागुन असलेली विना नंबर असलेली लाल रंगाची ट्राली चा चालक आरोपी नामे – १) आकाश गणेश दियेवार वय २७ वर्ष याने आपल्या वाहनात ०१ ब्रास रेतीची मौजा गडेगाव शिवारातील नाल्यातुन मालक नामे– २) सुनिल शंकरराव दियेवार वय ४० वर्ष दोन्ही रा. गडेगाव ता. सावनेर याचे सांगणे वरून वाळुची चोरीने उपसा करून चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून १) लाल रंगाचे महिंद्रा ५७५ डि आय कंपनीचे ट्रॅक्टर क्र. एम एच २९ बी सी २५८६ अंदाजे किंमती ३००००००/–रू मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ३०००/–रू. व त्याला लागुन असलेली विना नंबर असलेली लाल रंगाची ट्राली अंदाजे कि. १०००००/–रू, २) एक ब्रास रेती किंमती ३००० रू असा एकुण ४,०३,०००/–रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि सुनिल दहीभाते, पोहवा विशाल महालकर, पोहवा पगकाश नांदुरकर, पोशि पन्ना बटाउवाले यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर